Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawa
Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary.stateboard@gmail.com
Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 | Secretary(P) : 25651750

जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/५२०
दिनांक- ११/०२/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषय** - सन २०२१ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विदयार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ** :- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२०२/ एस.डी.२ दि.२४/११/२०१७
२. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-०१२१/प्र.क्र.०९/एसडी २ दि.०८/०२/२०२१ चे पत्र

उपरोक्त विषयी संदर्भिय क्र. १ च्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभाग होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतुद क्र.०५ नुसार याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी शाळेकडे दि.१५ डिसेंबर अखेर व शाळांनी विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख १५ जानेवारी अशी नमूद आहे

तथापि सध्या राज्यात कोविड १९ या विषाणुमुळे उदभवलेल्या परिस्थितीमुळे सदर शास्त्रीय कला ,चित्रकला व लोककला प्रस्ताव स्वीकारण्याच्या मुदतीमध्ये वाढ होण्याबाबत विविध स्तरावरून मागणी होत असल्याने या प्रकरणी मंडळाकडून शासनास मंडळाची परीक्षा साधारणपणे दोन महिने उशिराने सुरु होणार असल्याने मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास अनुसरून शासनाने संदर्भीय क्रमांक ०२ दिनांक ०८.०२.२०२१ च्या पत्रान्वये प्रस्ताव स्वीकारण्याच्या दोन्ही तारखांना खालीलप्रमाणे मुदतवाढ या वर्षाकरिताच दिलेली आहे.

| अ. क्र. | करावयाची कार्यवाही | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह नवीन प्रस्तावित अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे | दि.१५ डिसेंबर | दि.२७,फेब्रुवारी, २०२१ |
| २. | शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे | दि.१५ जानेवारी | दि.१५, मार्च,२०२१ |

तरी उपरोक्त शासन पत्रानुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरुन याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

आपला विश्वासू

(पोपटराव महाजन)
प्र. सचिव
राज्यमंडळ, पुणे-४.

क्र. कोविमं/माध्य.परीक्षा/ एप्रिल-२०२१/ 7038
कोल्हापूर - ४१६ ००४
दिनांक -१२/०२/२०२१

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त शाळा,
मुख्याध्यापक,
सातारा, सांगली, कोल्हापूर

उपरोक्त पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव कार्यालयास सादर करण्यास दिनांक १५/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मुदतीत प्रस्ताव सादर करण्याची दक्षता घ्यावी. तरी मुदतीनंतर प्रस्ताव सादर केल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**(डी.बी.कुलाळ)**
**प्र.विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**